**प्रेस नोट**

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

दिनांक 11 ऑक्टोबर 2020, मुबई, ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने सन 2011 दीन दयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (DAY-NRLM) सुरवात झाली. केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनान्वये राज्यात उमेद -महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदरील अभियान राज्यात 34 जिल्हे व 351 तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत ग्रामीण भागातील गरीब, वंचित, दुर्लक्षित, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, अल्पसंख्याक, आदिवासी, अदिमजमाती, दिव्यांग, विधवा, परितक्त्या व जोखीमप्रवण कुटुंबातील महिलांचे स्वयं सहाय्यता गट, गटांचे ग्रामसंघ व प्रभाग़संघ तयार करण्यात येतात. तसेच उत्पादक संघ व महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करण्यात येते. या सर्व समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करण्यात मोठ्याप्रमाणात प्रयत्न करुन त्यांना उपजीविकेचे स्त्रोत निर्माण करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनान्वये राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यत स्वतंत्र, संवेदनशील व समर्पित यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत राज्यातील 38581 गावांमध्ये अभियनाच्यामाध्यमातून काम करण्यात येत असुन आतापर्यत 4.72 लक्ष स्वयं सहाय्यता गट निर्माण झालेले आहेत. राज्यातील जवळपास 52 लक्ष कुटुंबे अभियानाशी जोडले गेलेले आहेत. अभियनाच्या माध्यमातून 20078 ग्रामसंघ तर 797 प्रभागसंघाची निर्मिती करण्यात आलेली आहे. बॅकेच्यामाध्यमातून रु. 7497 कोटीचे कर्ज स्वयं सहाय्यता गटांना उपलब्ध करुन देण्यात आले असून 18 लक्ष कुटुंबांकडे उपजीविकेचे स्त्रोत निर्माण झालेले आहेत. महिला त्यांच्या गरजेनुसार सहज कर्ज उपलब्ध व्हावे या हेतून अभियानांतर्गत निर्माण झालेल्या स्वयं सहाय्यता गटांसाठी महिला बॅक स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. भविष्यात स्वयं सहाय्यता गटाची सर्वात मोठी संस्था म्हणून अभियानाची ओळख निर्माण होणार असून महिला सक्षमीकरणाची मोठी चळवळ महाराष्ट्रात उभी राहणार आहे.

**उमेद अभियानांतर्गत सद्या सुरु असलेल्या सर्व योजना केंद्र व राज्य शासनामार्फ़त राबविण्यात येत असल्याने त्या तशाच पुर्वरत सुरु राहणार आहेत. याबद्दल निर्माण करण्यात आलेले गैरसमज चुकीचे आहेत. तरी सर्वांना जाहिर आवाहन करण्यात येते की, आपण कोणत्याही अफ़वांवर विश्वास ठेवू नये.**

ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फ़त दिनांक 26 ऑगस्ट 2020 रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा बाह्यस्थ् संस्थेमार्फ़त आऊट सोर्सिंग पध्दतीने घेणे आवश्यक आहे. यासाठी अभियनांतर्गत दिनांक 10 सप्टेंबर 2020 रोजी किंवा त्यानंतर करार संपलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा सीएससी ई-गव्हर्नस सर्विसेस इंडिया लि., नवी दिल्ली या बाह्यस्थ संस्थेमार्फ़त घेण्यात येणार आहेत. यासाठी सीएससी संस्थेस कार्यादेश देण्यात आलेल्या आहे व टप्या-टप्याने कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा बाह्यस्थ संस्थेमार्फ़त वर्ग करण्यात येतील.

अभियानांतर्गत कार्यरत कार्यरत सर्व स्वयं सहाय्यता गट, ग्रामसंघ, प्रभागसंघ व अभियनासंबंधित सर्व महिला भगिनींना कळविण्यात येते की, अभियनात कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतन मिळावे, त्यांच्या वेतनातून वैधानिक पुर्तता (Statutory Compliance) जसे ग्राज्युटी, ईएसआयसी इत्यादीचे कायदेशीर पालन व्हावे यासाठी अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचा-यांना बाह्यस्थ संस्थेमार्फ़त घेण्यात येणार आहे. यामध्ये अभियानातील कार्यरत कोणात्याही कंत्राटी कर्मचा-यांना कमी करण्यात येणार नाही. तसेच त्यांचे वेतन सुध्दा कमी केले जाणार नाही. त्यामुळे अभियानाबाबत पसरविल्या जाणा-या अफ़ावा ह्या खोड्या असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. तरी सर्वांना मी आवाहन करु इच्छितो की, अभियनाबाबत पसरविल्या जाणा-या अफ़वांवर कोणीही विश्वास ठेवू नये व आपण सर्वांनी मिळून अभियान यशस्वी करण्याचा प्रयत्न करावा, ही विनंती.

प्रविण जैन
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान